ePaper मराठा आरक्षणावर मागासवर्ग आयोगाचा अहवाल सादर, निवडणुकीपूर्वी कायदा होणार?

| वर्ष - 7 । अंक - 274 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- अश्विन सामन्यातून तडकाफडकी बाहेर
- अनुष्काच्या बाळाचा जन्म?
- घराणेशाहीमुळे नेते काँग्रेसमधून बाहेर!
- शिरूर मतदारसंघ राष्ट्रवादी


www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 17 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# माजी महापौर संजोग वाघेरेंच्या हाती 'मशाल' अन् पायाला भिंगरी!

## गाव भेट दौऱ्याचा झंझावात : मतदार संघामध्ये प्रचंड जनसंपर्क अन् भेटीगाठी

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे यांनी आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला आणि 'मशाल' हाती घेतली. त्यानंतर संपूर्ण मतदार संघात गावभेट दौऱ्याच्या निमित्ताने पायाला भिंगरी बांधली असून, प्रचंड जनसंपर्काचा झंझावात सुरू केला आहे.**

विशेष म्हणजे, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मोठ्या विश्वासाने संजोग वाघेरे यांच्याकडे "मावळ लोकसभा संघटक" पदाची जबाबदारी सोपवली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत वाघेरे यांना महाविकास आघाडीची उमेदवारी निश्चित मानली जाते.

येत्या लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष सक्रिय झाले असून, मतदारांच्या गाठीभेटी घेणे सुरू झाले आहे. शहर शिवसेनेनेही (उबाठा) गाव भेट दौरा आयोजित करून शहरातील विविध भागातील नागरिकांशी संवाद साधला आहे. परिसरातील समस्या, नागरिकांना भेडसावणारे प्रश्न याबाबतचा आढावा शिवसेना नेत्यांनी घेतला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मावळ लोकसभा संघटक संजोग वाघेरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना नेते आणि पदाधिकाऱ्यांचा गाव भेट दौरा झाला. या दौऱ्यात संजोग वाघेरे यांनी बोपखेलमधील सर्व नागरिकांशी संवाद साधला. बोपखेलमध्ये भेडसावणारे प्रश्न जाणून घेतले. ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधून त्यांना अपेक्षित असणाऱ्या विकासाबाबत चर्चा केली. शिवसेना शहर प्रमुख सचिन भोसले, माजी आमदार गौतम चाबुकस्वार, शिवसेना पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.



### पुलाच्या कामाबाबत वाघेरेंना विनंती...

बोपखेल येथील सैन्य दलाच्या हद्दीतील पुलाचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. अनेक राजकीय नेत्यांनी या पुलाबाबत आश्वासने दिली आहेत. मात्र, अद्यापही या पुलाचे काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे संजोग वाघेरे यांच्याकडे बोपखेल येथील नागरिकांनी पुलाचे काम पूर्ण करून घेण्यासाठी विनंती केली. त्यावर, महापालिका आयुक्त तसेच शासनाकडे या बाबत पाठपुरावा सुरू असल्याचे वाघेरे यांनी सांगितले. दरम्यान, काही वर्षांपूर्वी बोपखेलच्या नागरिकांनी पुलासाठी आंदोलन केले होते. त्यावेळेस त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले होते. हे गुन्हे मागे घेण्यात यावेत, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

# फिरवला ना बुलडोझर! : युपीत योगीजी अन् महाराष्ट्रात देवेंद्रजी..!

## भाजपा आ. महेश लांडगे; अत्याचाऱ्यांची खैर नाही; नराधम नौशाद शेखच्या अवैध बांधकामावर हातोडा

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

अत्याचारी, नराधमांचा बिमोड करण्यासाठी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी कठोर पावले उचलली. चुकीची कामे करणाऱ्यांच्या अवैध बांधकामांवरती अक्षरश: बुलडोझर फिरवला. त्याच धर्तीवर महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शैक्षणिक संस्थेतील मुलींचे लैंगिक



शोषण करणाऱ्या नौशाद शेख सारख्या प्रवृत्तींना वचक बसवण्यासाठी त्याच्या अवैध बांधकामावरती हातोडा घातला. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे, अशी खणखणीत प्रतिक्रिया भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी दिली आहे.

रावेत येथील क्रिएटिव्ह अकॅडमीचा संस्थाचालक नौशाद शेख याने अनेक अल्पवयीन मुलींवर लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे पुणे जिल्ह्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रभर पिंपरी-चिंचवडची बदनामी झाली. अनेक निष्पाप मुलींना अत्याचाराचा सामना करावा लागला. त्यामुळे नौशाद शेख याची संस्था आणि बांधलेली इमारत याबाबत चौकशी करून त्याला धडा शिकवण्यासाठी कठोर कारवाई करावी, अशी मागणी शहरातील हिंदुत्ववादी संस्था संघटना आणि भाजपाच्या पदाधिकाऱ्यांनी केली होती. दरम्यान, पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने या संस्थेच्या अतिक्रमणावर शुक्रवारी बुलडोझर चालविण्यात आला.

> "रावेत येथील क्रिएटिव्ह अकॅडमीचा संस्था चालक नौशाद शेख याने अनेक अल्पवयीन मुलींवर लैंगिक शोषण केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर अशा प्रवृत्तींना शहरात कदापि थारा देवू नये आणि संबंधितांच्या बेकायदा संस्था व बांधकामांवर बुलडोझर फिरवणार, अशी ग्वाही पिंपरी-चिंचवडकरांना जाहीरपणे दिली होती. आज पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने त्या संस्थेच्या अतिक्रमणावर बुलडोझर चालविला. याबाबत पोलीस आणि महापालिका प्रशासनाचे तमाम हिंदू समाज संघटनांकडून कौतूक आहेच. पण, या नराधमावर आणखी कठोर कारवाई झाली पाहिजे, अशी आमची भावना आहे.
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पक्ष विलीनीकरणाच्या वृत्ताचे खंडन!

## पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात राजकीय स्थित्यंतरे होत असतानाच 'राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार' पक्ष काँग्रेसमध्ये विलीन होणार असल्याची चर्चा बुधवारी या पक्षाच्या बैठकीनंतर रंगली. मात्र पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी विलीनीकरणाच्या मुद्द्याचे तातडीने खंडन केले.**



> पक्षाचा लढा सत्तेसाठी नसून, अस्तित्वासाठी आहे. त्यामुळे कुठेही विलीन होण्याचा प्रश्नच नाही. आगामी निवडणुकीत शरद पवार यांच्या नेतृत्वात लढून ऐतिहासिक विजय मिळविला जाईल. इंडिया आघाडीचा पुण्यात पुढील आठवड्यात मेळावा होणार आहे.
>
> **– प्रशांत जगताप,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार

पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू असला तरी, प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची शक्यता असल्याने नवीन नाव आणि चिन्हासह आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासंदर्भात ही बैठक होती. तशी सूचना पवार यांनी केल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, काँग्रेसला न दुखविण्याची सूचनाही पवार यांनी या बैठकीत केल्याचे सांगण्यात आले.आगामी लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. पक्ष आणि चिन्ह गेल्यानंतरची पक्षाची ही पहिलीच मोठी बैठक होती. खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील एका माजी पदाधिकाऱ्याने काँग्रेसमध्ये विलीनीकरणासंदर्भातील चर्चा या बैठकीत झाल्याचा दावा एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. त्यानंतर विलीनीकरणाचा मुद्दा रंगण्यास सुरुवात झाली. त्याची चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या नेत्यांनी मात्र त्याचे तातडीने खंडन केले. सुप्रिया सुळे, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे यांनी विलीनीकरणाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. केंद्रात आणि राज्यात सुरू असलेली दडपशाही जनता पहात आहे. त्यामुळे जनतेपर्यंत पोहोचून त्यांना धीर द्यायचा आहे. नवे पक्ष आणि निवडणूक चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जायचे आहे, असा निर्धार या बैठकीत व्यक्त करण्यात आल्याचा दावा नेत्यांकडून करण्यात आला.दरम्यान, आगामी निवडणुकीत काँग्रेसला न दुखविण्याची सूचना केल्याची माहितीही काही पदाधिकाऱ्यांनी दिली. महाविकास आघाडीतील मित्र पक्षांशी सुसंवाद साधा, असे सांगणे म्हणजे विलीनीकरण होत नाही, असा दावाही करण्यात आला.पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह यासाठी सर्वोच्च न्यायालयात लढा सुरू असला तरी, प्रदीर्घ न्यायालयीन प्रक्रियेची शक्यता असल्याने नवीन नाव आणि चिन्हासह आगामी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाण्यासंदर्भात ही बैठक होती. तशी सूचना पवार यांनी केल्याचा दावा करण्यात आला. दरम्यान, काँग्रेसला न दुखविण्याची सूचनाही पवार यांनी या बैठकीत केल्याचे सांगण्यात आले.आगामी लोकसभा आणि त्यानंतर होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या अनुषंगाने शरद पवार यांच्या मोदीबाग येथील कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. पक्ष आणि चिन्ह गेल्यानंतरची पक्षाची ही पहिलीच मोठी बैठक होती. खासदार सुप्रिया सुळे, वंदना चव्हाण, श्रीनिवास पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, संदीप क्षीरसागर, माजी मंत्री अनिल देशमुख, राजेश टोपे, शशिकांत शिंदे, बाळासाहेब पाटील यांच्यासह अन्य प्रमुख पदाधिकारी या बैठकीला उपस्थित होते. या बैठकीनंतर पुणे जिल्ह्यातील एका माजी पदाधिकाऱ्याने काँग्रेसमध्ये विलीनीकरणासंदर्भातील चर्चा या बैठकीत झाल्याचा दावा एका वृत्तवाहिनीशी बोलताना केला. त्यानंतर विलीनीकरणाचा मुद्दा रंगण्यास सुरुवात झाली. त्याची चर्चा सुरू असतानाच पक्षाच्या नेत्यांनी मात्र त्याचे तातडीने खंडन केले. सुप्रिया सुळे, रोहित पवार, डॉ. अमोल कोल्हे यांनी विलीनीकरणाच्या संदर्भात कोणतीही चर्चा झाली नसल्याचे सांगितले. केंद्रात आणि राज्यात सुरू असलेली दडपशाही जनता पहात आहे. त्यामुळे जनतेपर्यंत पोहोचून त्यांना धीर द्यायचा आहे. नवे पक्ष आणि निवडणूक चिन्ह घेऊन निवडणुकीला सामोरे जायचे आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये राष्ट्रवादीच्या "स्वराज्य ज्योत" चे उत्साहात स्वागत

## 'जय भवानी, जय शिवाजी'चा जयघोष : शहरातील शिवप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठी भाषा समृद्ध करणारे जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि शूरता, वीरता, पराक्रमाचे प्रतीक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भेटीचे स्मृतिस्थळ भक्ती-शक्ती शिल्पसमूह इथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित 'स्वराज्य रथ' आणि 'स्वराज्य ज्योत' पोहोचली.**




पिंपरी चिंचवड शहर पदाधिकाऱ्यांनी 'स्वराज रथा'चं ढोल ताशा गजरात जल्लोषात स्वागत करत फुलांचा वर्षाव करण्यात आला. तसेत 'जय भवानी, जय शिवाजी' या घोषणेने संपूर्ण भक्ती-शक्ती चौक परिसर दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड शहरातील नाशिक फाटा येथे पिंपरी चिंचवड कार्याध्यक्ष शाम लांडे यांनी 'स्वराज रथा'चं उत्साहात स्वागत केलं.

### यांची मोठ्या संख्येने उपस्थिती...

**यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, सरचिटणीस बाप्पा सावंत, सेवादल सेलचे राज्यप्रमुख राजेंद्र लावांघरे, पिंपरी चिंचवड शहरध्यक्ष अजित गव्हाणे, कार्याध्यक्ष राहुल भोसले, पिंपरी चिंचवड खजिनदार दीपक साकोरे, युवक शहर अध्यक्ष शेखर काटे तसेच शिवप्रेमींसह पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

# पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या कामाचा अखेर 'टेकऑफ'!

## जमीन सपाटीकरणाच्या कामाला सुरुवात, आमदार महेश लांडगे यांनी केली पाहणी

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या इमारतीच्या कामाला आज अखेर सुरूवात झाली. त्यामुळे लवकरच प्रत्यक्ष इमारत उभारणीच्या कामाला सुरुवात होणार आहे. तत्पूर्वी, जमीन सपाटीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. या कामाची भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पाहणी केली.**

यावेळी माजी महापौर राहुल जाधव, सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे, निलेश बोराटे आदी उपस्थित होते. शहरासाठी स्वतंत्र न्यायालय संकूल असावे आणि पक्षकार तसेच सर्वसामान्य नागरिकांना व विधीज्ञांना पुणे ऐवजी शहरातच खटल्यांचे कामकाज करण्याची सुविधा असावी या करिता आमदार महेश लांडगे यांनी २०१४ पासून सातत्याने पाठपुरावा केला. राज्य सरकारच्या मंजुरीसाठी विधानसभा अधिवेशनातील आवाज उठवला होता. पर्यावरण विभागासह राज्य सरकारच्या विविध विभागांची ना हरकत दाखला घेतल्यानंतर मोशी येथील सेक्टर १४ येथे इमारतीसाठी जागा उपलब्ध झाली. त्याचे सपाटीकरण आता सुरू आहे.

दि. ८ मार्च १९८९ साली पिंपरी-चिंचवड न्यायालयाची स्थापना झाली. मात्र, अद्याप इमारतीचा प्रश्न मार्गी लागला नाही. पण, आमदार महेश लांडगे आणि पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट्स बार असोसिएशनच्या आजी-माजी अध्यक्षांच्या माध्यमातून सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात आला. त्याला यश मिळाले असून आता न्यायसंकुलाची इमारत दृष्टीक्षेपात आली आहे.



### शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा..

आमदार महेश लांडगे म्हणाले की, पुणे जिल्हा प्रमुख न्यायाधीश महेंद्र महाजन यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. त्यानंतर संबंधित ठेकेदार आणि पीडब्ल्यूडी विभागाच्या अधिकाऱ्यांना कामाबाबत सूचना केली. त्यानुसार प्रत्यक्ष कामाला सुरूवात झाली. नवीन न्यायालय इमारतीमध्ये एकूण ९ मजले आणि अतिरिक्त सत्र न्यायालय होर आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात एकूण ४ मजले आणि २६ कोर्ट हॉल अशी सर्व सुविधायुक्त इमारत शहराच्या वैभवात भर घालणार आहे. शहरातील वकीलांचे स्वप्न पूर्ण होत आहे, असा विश्वासही आमदार लांडगे यांनी व्यक्त केला.

> **नवीन न्यायालयाच्या इमारतीमुळे भविष्यात पिंपरी-चिंचवड शहरातील सर्वसामान्य नागरिकांचा वेळ, पैसा वाचेल. कामांना गती मिळेल. ही प्रशस्त इमारत पिंपरी-चिंचवड शहराच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा असेल, असा विश्वास वाटतो. पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी पाहिलेले आणखी एक महत्त्वाकांक्षी स्वप्न पूर्ण होत आहे, याचा विशेष आनंद आहे. पिंपरी-चिंचवड न्यायालयाच्या स्वतंत्र इमारतीसाठी सकारात्मक भूमिका घेणारे राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व 'महायुती' सरकारचे तमाम पिंपरी-चिंचवडकरांच्या वतीने आभार व्यक्त करतो.**
>
> **- महेश लांडगे,** आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# गायकवाडनगर-पुनावळे ते निगडी पीएमपी बस सुविधा!

## प्रवाशांमध्ये समाधान; भाजपा मंडल उपाध्यक्ष राहुल काटे यांचा यशस्वी पाठपुरावा

।पिंपरी।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुनावळे आणि परिसरातील नागरिकांच्या मागणीनुसार गायकवाडनगर पुनावळे ते निगडीपर्यंत पीएमपी बस सुविधा सुरू करण्यात आली. त्यामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे.**




या भागात गेल्या १० वर्षांमध्ये मोठ्या प्रमाणात नागरीकरण झाले आहे. महापालिका हद्दीतील समाविष्ट गावांमध्ये सार्वजनिक प्रवासी वाहतूक व्यवस्था सक्षम करण्याची आवश्यकता आहे. आयटी आणि औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचारी, नागरिकांची संख्या मोठी असल्यामुळे सार्वजनिक प्रवास सुविधा सुरू करावी, अशी मागणी होत होती. त्यानुसार, भाजपा मंडल उपाध्यक्ष राहुल काटे आणि स्थानिक कार्यकर्त्यांनी पीएमपीएमएल प्रशासनाने पाठपुरावा सुरू केला होता. त्याला यश मिळाले. पीएमपी बस क्रमांक-363 ची सुरूवात उत्साहात करण्यात आली. यावेळी भाजपा मंडल उपाध्यक्ष राहुल काटे, युवा नेते नवनाथ ढवळे, कामगार नेते सुरेश रानवडे व पुनावळे परिसरातील नागरिक उपस्थित होते. राहुल काटे म्हणाले की, स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार आणि आमदार अश्विनी जगताप तसेच भाजपाचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पीएमपी बस सुविधा सुरू करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. या बसचा फायदा परिसरातील नागरीकांनी घ्यावा तसेच भविष्यात नवीन मार्गावंर सुविधा सुरू करण्याचा मानस आहे. सर्वसामान्य प्रवाशांना बस सुविधेचा लाभ होईल, अशा भावना राहुल काटे यांनी व्यक्त केल्या आहेत.

### सियोना ज्येष्ठ नागरिक संघाच्या मागणीला यश...

पीएमपी बस रुट क्रमांक ३६३ च्या सकाळी व दुपारी ३ फेऱ्या कोयतेवस्ती-पुनावळेपर्यंत करण्यासाठी सियोना ज्येष्ठ नागरिक संघाने प्रशासनाने सातत्याने मागणी केली आहे. पीएमपी बस अभावी स्थानिक नागरिक, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत होता. याबाबत प्रशासनाने सकारात्मक दृष्टीने कार्यवाही करावी. यासाठी संघाचे अध्यक्ष भालचंद्र कुलकर्णी, कार्याध्यक्ष प्रकाश कोडुले, सचिव आनंद शेट्टी आणि सहकाऱ्यांनी प्रशासनाकडे केलेल्या मागणीला यश मिळाले आहे. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

# माध्यमांची परीक्षा पाहणाऱ्या कलाकृती




**कुठल्याशा विद्यापीठात कलाविषयक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा भाग म्हणून सादर झालेल्या कलाकृतींनी समजा कुणाच्या भावना दुखावल्या तर काय होतं, याचं प्रस्तुत लेखकानं अगदी जवळून पाहिलेलं उदाहरण २००७ सालच्या मे महिन्यातलं.**

बडोदे इथल्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या दृश्यकला विभागात शिल्प, रंगचित्रं, मुद्राचित्रण अशा उपविभागांमध्ये पदवी आणि पदव्युत्तरच्या अखेरच्या वर्षीच्या परीक्षेचा भाग म्हणून, या परिसरातली एखादी जागा निवडून परीक्षार्थींना आपापल्या कलाकृतींचं छोटेखानी प्रदर्शन मांडावं लागतं. बाहेरचे परीक्षक या कलाकृती पाहतात, त्याबद्दल संबंधित परीक्षार्थीची (उद्याच्या कलावंताची) भूमिका जाणून घेण्यासाठी त्या परीक्षकांकडून मुलाखत घेतली जाते.. शिवाय कोणाही कलारसिकांना पाहण्यासाठी हे परीक्षाप्रदर्शन खुलंच असतं, अशी पद्धत अनेक वर्षांची. पण २००७ पासनं तिच्यात बदल झाला. कोणता बदल, ते नंतर पाहू. बदलच करावा लागण्यासारखं काय घडलं, ते आधी सांगतो. त्या वर्षी, मुद्राचित्रण शिकणारा एक विद्यार्थी चंद्रमोहन यानं येशू, दुर्गा यांच्या रूढ प्रतिमांना मानवदेहाच्या वाट्याला निसर्गानं दिलेले भोग (उत्सर्जन, जनन) जर आले तर काय होईल, अशा प्रकारची कल्पना करून तीवर



आधारित कलाकृती केल्या होत्या. कल्पना किती ताणावी, कुठे थांबावं हे या परीक्षार्थीला कळत नाही, हे त्याच्या कलाकृतींतून दिसत असल्याचं माझं प्रथमदर्शनी मत झालं. पण मुद्राचित्रण विभागातला असूनही त्यानं शिल्पं, मांडणशिल्प केली आहेत, हे पाहता या तरुणाचा कामाचा उत्साह भरपूर असणार हे अधिक प्रकर्षानं दिसत होतं आणि त्या उत्साहाच्या भरात आशयाकडे दुर्लक्ष झालं असेल, असं मानायला जागा होती. ही 'मानायला जागा' जी असते, ती खूप-खूप महत्त्वाची असते. ज्याला कलावंताचा कलेचा 'अवकाश' असं म्हटलं जातं ती ही जागा असते. तो अवकाश किती संकुचित आहे आणि फक्त 'कलाकृतीत देव दिसतायत आणि तेही काहीतरी घाणेरडं करताना दाखवले आहेत' एवढंच पाहून या अख्ख्या परीक्षाप्रदर्शनावर घाला आणला जातो आहे, संबंधित विद्यार्थ्याला अटक होते आहे (पुढे जामीनही मिळत नाही), त्यानं ज्या भागात स्वतःच्या परीक्षा-कलाकृती ठेवल्या त्या खोल्याच 'मुद्देमालासह सीलबंद' केल्या जाताहेत, या निमित्तानं या विद्यापीठाच्या अख्ख्या कलाविभागाला आणि विशेषतः तिथल्या काही पुरोगामी शिक्षकांना 'कुजबुज ब्रिगेड'च्या हल्ल्याचं लक्ष्य बनवलं जात आहे , असा अनपेक्षित घडनाक्रम घडत गेला. राज्य गुजरात, शहर बडोदे आणि सन २००७ हा स्थळकाळसंदर्भ पुरेपूर अंगी बाणलेले असे जे बडोदेवासी काहीजण होते, त्यापैकी काही 'हितचिंतकां'नी संबंधित विद्यार्थ्याला सांगितलंही होतं म्हणे- "तुझ्यामुळे सगळे गोत्यात येतील, असं नको करू". पण त्याला तो सल्ला कळला नाही आणि व्हायचं ते झालं. यामागे जो सत्ताधारी, शिरजोर पक्ष कार्यरत होता त्यातल्या एका तत्कालीन वकील-कार्यकर्त्यानं, विशेषतः प्रादेशिक भाषांतल्या आणि त्यातही विशेषतः टीव्ही चॅनेलच्या पत्रकारांना आत नेऊन, 'हा पाहा केवढा अपमान धर्माचा, केवळ आपल्याच नव्हे, त्यांच्याही धर्माचा..' अशी कॉमेंट्री आरंभल्याचाही अनुभव प्रस्तुत लेखकानं तेव्हा घेतला होता.'कलेच्या जागी कलेचीच चर्चा करा" हा जर दंडकिबडक असेल तर हा दंडक कोण, कसा नि किती पायदळी तुडवतंय याचा उत्तुंग वस्तुपाठ त्यातून मिळाला होता. हा प्रकार घडल्यानंतर विद्यापीठाच्या त्या विभागातलं वातावरण कलुषित झालं, लोकशाहीप्रेमी विद्यार्थ्यांनी पुढल्या शैक्षणिक वर्षांतही विरोध सुरू ठेवला वगैरे.. आणि विद्यापीठाच्या कलाविभागानं परीक्षा-प्रदर्शनाचे नियमही बदलले. बाहेरून आलेल्या परीक्षक मंडळाचं काम पूर्ण झाल्यानंतरच, 'निवडक' कलाकृती सर्वांना पाहण्यासाठी खुल्या केल्या जाव्यात असा साधारण तो बदल होता. हे सारं पाळतशाहीकडे नेणारं आहे, हे तिथं त्यापुढल्या वर्षांमध्ये शिकणाऱ्या श्रेयस कर्ले याला उमगलं असावं. म्हणूनच तर त्यानं रॉकेल वगैरे भरण्यासाठी जे टिनाचं नरसाळं वापरतात तशाच आकाराची पण तीनतीन फुटांपर्यंत उंचीची नरसाळी उलटी ठेवलेली आहेत, त्यांच्या निमुळत्या नळकांड्यांची टोकं करकरीत कोनामध्ये वाकलेली आहेत आणि त्या नळकांड्याच्या अगदी टोकाला भोक नसून, डोळा लावलेला आहे.

## संपादकीय »

# विक्राळ अंतराळ

***पृथ्वीवरील संघर्षांत नाही म्हणायला तहनामे, करार, शस्त्रबंदी आदी उपाय उपलब्ध तरी आहेत. अंतराळाच्या बाबतीत अद्याप तसले काही अस्तित्वातच नाही.***

तिसरे महायुद्ध कोणत्या शस्त्रांनिशी लढले जाईल हे सांगता येत नाही. पण चौथे महायुद्ध काठ्या-दगडांनिशी लढले जाईल हे नक्की..' हे उद्गार आहेत, दुसऱ्या महायुद्धाचा विध्वंस आणि अण्वस्त्रयुगाची नांदी यांचे साक्षीदार राहिलेले विख्यात शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाइन यांचे. शस्त्रास्त्रे आणि वर्चस्ववादाची कधीही न शमणारी भूक एक दिवस आधुनिक मानवाला एखाद्या संहारपर्वानंतर आदिमानवावस्थेकडे घेऊन जाईल, याविषयी त्यांना खात्री असावी. त्यांना 'न उमगलेले' तिसरे महायुद्ध कदाचित पृथ्वीतलावर लढले जाणारही नाही. ते कसे, याची कल्पना यावी यासाठी एका बातमीचा दाखला देणे आवश्यक ठरते. अमेरिकेत व्हाइट हाउस प्रवक्त्याने परवा एक निवेदन जारी केले, ज्यात रशियाने विकसित केलेल्या एका गूढ कृत्रिम उपग्रहविरोधी अस्त्राचा (अँटी-सॅटेलाइट वेपन) उल्लेख आहे.

मागील महिन्यात केंद्र शासनाने कोचिंग क्लासेस व्यवसायासाठी नियमावली तयार करण्यासंदर्भात राज्यांना काही मार्गदर्शक सूचना दिल्या. त्यामध्ये १६ वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी कोचिंग क्लासेस असू नयेत, अशी महत्त्वपूर्ण सूचना केंद्र शासनाने राज्यांना केलेली आहे.

# कोचिंग क्लासेसना 'स्टार्टअप' दर्जा द्या

मुळात कोट्यवधी रुपयांचे बजेट असलेली शासनाची शिक्षण व्यवस्था अस्तित्वात असताना कोचिंग क्लासेसची गरजच का पडावी याचा विचार सर्वप्रथम करणे गरजेचे आहे. याला कारणीभूत आहे शासनाची शैक्षणिक व्यवस्था, ज्यामध्ये विद्यार्थ्यांचे व पालकांचे समाधान होत नाही, तर दुसरीकडे वाढलेली जिवघेणी शैक्षणिक स्पर्धा व पालकांच्या अतिमहत्त्वाकांक्षा.३०-४० वर्षांपूर्वी अभ्यासात कमकुवत असलेले १० टक्के विद्यार्थी कोचिंग क्लास लावायचे. आता शासनाच्या शिक्षण व्यवस्थेत ९० टक्के विद्यार्थी कमकुवत असतात आणि म्हणून ते कोचिंग क्लासला जातात. कोचिंग क्लासेस चालवणारे शिक्षक सुशिक्षित आहेत, परंतु त्यांच्या हाताला काम नसल्यामुळे ते बेरोजगार आहेत, त्यामुळे ते इमानी इतबारे सकाळी सहापासून व्यावसायिक भूमिकेतून कोचिंग क्लासेस चालवतात. खासगी व्यवसाय असल्यामुळे व्यवसायवाढीसाठी आवश्यक असणाऱ्या पायाभूत सुविधा



ते स्वतःच उभ्या करतात. जो तो आपल्या कुवतीप्रमाणे जाहिरात तंत्राचा वापर करून आपला व्यवसाय वाढवण्याचा प्रयत्न करतो. खासगी कोचिंग क्लासेस संचालकांच्या सचोटीमुळे आणि त्यांच्या कौशल्यांमुळे पालक त्यांच्याकडे आकृष्ट होतात व आपल्या पाल्यासाठी स्वेच्छेने खर्च करतात. सुरुवातीला साधारणपणे उदरनिर्वाहाचे साधन म्हणून एक शिक्षकी कोचिंग क्लास सुरू होतो. पुढे त्या क्लासचा नावलौकिक होतो व विद्यार्थीसंख्या वाढते. अनेक शिक्षकांना यातून रोजगार मिळतो. अनेक गृहिणी शिकवणी व्यवसायातून आपल्या कुटुंबाला हातभार लावतात. शासन एकीकडे स्वयंरोजगाराचा डांगोरा पिटते आणि दुसरीकडे कोचिंग क्लासेस संचालकांनी स्वतःच्या भरवशावर नावरूपास आणलेला व्यवसाय बंद करण्याचा विचार करते, हा कुठला न्याय? शासन स्तरावर कोचिंग क्लासेसची सकारात्मक बाजू केव्हा लक्षात घेतली जाईल?विद्यार्थ्यांच्या शाळांच्या वेळा सांभाळून सकाळी ६ पासून कोचिंग क्लासेसचा संचालक अभ्यासक्रम, चाचणीच्या वेळा, टेस्ट पेपर, विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवणे, पालक सभा आयोजित करणे यासारख्या शाळेला समांतर असलेल्या अनेक गोष्टी करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. अनेक आव्हानांना तोंड देत कोचिंग क्लासेस संचालक आपल्या व्यवसायाचा दर्जा उत्तम टिकवण्यासाठी प्रयत्न करतो, जर त्यांनी नावलौकिक मिळवला नाही तर त्याच्याकडे कुठलाही पालक आपल्या पाल्याला पाठवणार नाही ही वस्तुस्थिती आहे. 'हाडाचा शिक्षक' ही संकल्पना कोचिंग क्लासेसमध्ये पाहायला मिळेल. पण नेमके शासनाचे या सर्व सकारात्मक बाबींकडे दुर्लक्ष होते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# खेड तालुक्यातील राजगुरूनगर, चाकण, आळंदी शहरात सांस्कृतिक सभागृह उभारा!

## आम आदमी पार्टी युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मयूर दौंडकर यांची मागणी

।पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**खेड तालुक्यात आळंदी ही जुनी नगरपालिका असून महाराष्ट्रातील एक महत्वाचे तीर्थक्षेत्र आहे. तसेच चाकण, राजगुरुनगर या नगरपालिका अलीकडील कालखंडात अस्तित्वात आलेल्या आहेत. चाकण औद्योगिक दृष्ट्या महत्वाचे शहर असून महत्वाची बाजारपेठ आहे. राजगुरुनगर हे ऐतिहासिक तसेच तालुक्याचे ठिकाण/प्रमुख शहर आहे.**



खेड तालुक्याला ऐतिहासिक, सांस्कृतिक, वारसा असून सांस्कृतिक वारसा जतन करून वृद्धिगत करण्यासाठी नागरिकांसाठी सांस्कृतिक नाट्यगृह/ सभागृह स्थापनेची गरज आहे. या तीनही नगरपालिका क्षेत्रात सांस्कृतिक नाट्यगृह/ सभागृह प्रस्थापित झाले तर नाट्य, कला ,अभिनय, व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे व त्याचा आस्वाद घेणे शक्य होणार आहे. याशिवाय यातून स्थानिक नगरपालिकांना उत्पन्नाचे स्त्रोतही निर्माण होणार आहे. स्थानिक नगरपालिकेतील सामान्य नागरिक कर भरत असून त्यांना योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देण्याची प्रमुख कर्तव्य नगरपालिकांचे आहे.

यासाठी तालुक्यातील आळंदी, चाकण, खेड,नगरपालिका हद्दीत स्थानिक नागरिकांच्या मागणीनुसार/गरज म्हणून सांस्कृतिक नाट्यगृह/ सभागृह सुरू करण्यात यावे.

अशी मागणी निवेदनाद्वारे तालुक्याचे नायब तहसीलदार आर.बी. बिजे यांच्याकडे आम आदमी पार्टी खेड- आळंदी विधानसभा यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी आम आदमी पार्टीचे युवा आघाडीचे प्रदेशाध्यक्ष मयूर मगन दौंडकर तसेच श्री. दत्तात्रय ढेरंगे, श्री. सुधीर डावरे उपस्थित होते.

> “ खेड आळंदी विधानसभा क्षेत्रातील नागरिकांचे जीवनमान उंचवण्यासाठी पायाभूत सुविधा पुरवणे हे शासनाचे आद्यकर्तव्य आहे. आज पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही मेट्रो सिटीलगत असणाऱ्या खेड तालुक्याची दयनीय अवस्था झालिये. कुठल्याही प्रकारच्या पायाभूत सुविधा आज या ठिकाणी देण्यात येत नाहीयेत. आम आदमी पार्टी नागरिकांना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळव्यात म्हणून नेहमीच झगडत राहील.
>
> – **मयुर दौंडकर,**
> प्रदेशाध्यक्ष आम आदमी पार्टी युवा आघाडी महाराष्ट्र राज्य.

# जावळी तालुक्यात बिबट्याचा वावर वाढल्याने शेतकरी चिंतेत

## शेतकऱ्यांचा इशारा, तर वन विभागाला झोपेतून जागे करु

। मेढा । निलेश दुटाळ
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरीकरणामुळे वन्यजीवांचे क्षेत्र कमी होत आहे. त्यामुळे वन्य आणि मानवातील संघर्ष वाढला आहे. आज बिबट्याचा मुक्त संचार मानवीवस्तीकडे होताना दिसत आहे. कारण, मानवाकडून झालेली जंगलतोड, वृक्षतोड, जंगलामध्ये झालेलं अतिक्रमण यामुळे वन्यप्राण्यांची मानवी वस्तीकडे वाटचाल पाहायला मिळत आहे.**



जावली तालुक्यातील आलेवाडी परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून बिबट्याचा मुक्त संचार होत असून पाळीव प्राणी, श्वानावर हल्ला करुन भक्ष करीत असल्याने नागरिक दहशतीखाली वावरत आहेत. मालदीव घाटात बिबट्या मुक्तपणे संचार करत असल्याने रानात जनावरे चारण्यासाठी घेऊन जाणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे.जावली तालुका हा वनसंपदेने समृद्ध आहे. इथे वनसंपदे सोबतच वन्यजीव सुद्धा इथे भरपूर आहेत. मात्र आजकाल वन्यजीव मानवी वस्तीत घुसून पाळीव प्राणी, गोधन, व माणसांवर हल्ले करण्याचे प्रकार वारंवार होत आहेत. सर्व होत असताना वनविभाग मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. काल रात्री सात वाजता जावली तालुक्यातील आलेवाडी ता. जावली, जि. सातारा येथे एका बिबट्याने कुत्र्यावर हल्ला करत त्याला जखमी केले. अशा घटना वारंवार या परीसरात घडत असताना वन विभाग मात्र मुग गिळून गप्प बसले आहे.

आलेवाडी येथील नागरिकांनी वारंवार वन विभागाला या हिंस्र प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी अनेक वेळा निवेदन देण्यात आले आहे. मात्र वन विभाग यावर नागरिकांना सांगत आहे की वन्य प्राण्यांना काही करू नका. आलेवाडी, मालदेव, मेढा घाटात, मरडमुरे या ठिकाणी रोज बिबट्याचे दर्शन होत आहे. आज पाळीव प्राण्यांवर हल्ले होत आहेत.

> “ देव न करो उद्या बिबट्या जर एखाद्या लहान मुलाला घेऊन गेला तर अथवा शेतात काम करणाऱ्या महिलेवर किंवा माणसावर हल्ला केला ,तर काय करायचे. त्यामुळे वनविभागाने जर याचा लवकरात लवकर बंदोबस्त नाही केला तर आम्ही वन विभागाला झोपेतून जागे करण्यासाठी रस्त्यावर उतरु.
>
> **-लक्ष्मण पवार, ग्रामस्थ आलेवाडी. ता. जावली जि. सातारा**

# शिरूर मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेसकडे?

। पुणे ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

पुणे गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळाच्या (पुणे) म्हाडा अध्यक्षपदी शिवसेनेचे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. गेल्या चार वर्षांपासून हे पद रिक्त होते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती केल्याने आढळराव यांचा शिरूर हा मतदारसंघ महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस किंवा भाजपकडे जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.राज्य शासनाचे उपसचिव अजित कवडे यांनी याबाबतचे आदेश प्रसृत केले.

या पदाचा कार्यभार यापूर्वी कोल्हापूरचे भाजपचे नेते समरजितसिंह घाटगे आणि एकत्रित राष्ट्रवादीचे नेते अंकुश काकडे यांनी सांभाळला आहे. हे पद २०२० पासून रिक्त होते. प्रादेशिक मंडळाचे कामकाजाबाबत धोरण आखणे, आढावा घेणे, नियंत्रण करणे, प्रादेशिक मंडळाच्या दोन प्रकरणासंदर्भात धोरणात्मक निर्णय घेणे, प्रधानमंत्री आवास योजना आदी कामे म्हाडाच्या माध्यमातून त्यांना कामे करता येणार आहे. घाटगे यांनी हे पद एक ते दीड वर्ष सांभाळले होते. त्यांच्यापूर्वीही काही वर्षे हे पद रिक्त होते. पुण्याचे माजी महापौर अंकुश काकडे यांनी हे पद भूषविले होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेवरून आढळराव यांची ही नियुक्ती करण्यात आली आहे. आढळराव यांना राज्यमंत्री पदाचा दर्जा असणार आहे.दरम्यान, आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आढळराव हे शिरूर लोकसभा मतदारसंघातून प्रबळ दावेदार मानले होते.

# घराणेशाहीमुळे नेते काँग्रेसमधून बाहेर!

## केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे : पंतप्रधान मोदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

"काँग्रेस घराणेशाहीच्या दुष्टचक्रात अडकलेला पक्ष असून, त्यामुळेच या पक्षाचे अनेक जण हा पक्ष सोडून जात आहे. काँग्रेस भविष्याचा वेध घेऊ शकत नाही आणि त्यासाठी त्यांच्याकडे कोणतीही कृतियोजनाही नाही. फक्त 'मोदीविरोध' एवढीच त्यांची एकसूत्री भूमिका आहे," अशी टीका पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी केली. 'विकसित भारत-विकसित राजस्थान' कार्यक्रमास दूरदृश्य प्रणालीद्वारे संबोधित करताना मोदी बोलत होते.



मोदी म्हणाले, की पराकोटीचा मोदीविरोध हेच काँग्रेसचे एकमेव धोरण आहे. मोदींच्या विरोध करताना समाजात फूट पडेल, अशा खोट्या गोष्टी ते पसरवतात. सध्या सर्व जण काँग्रेस सोडत आहेत. काँग्रेसचा कारभार एकाच कुटुंबाकडे एकवटलेला दिसत आहे. हे राजकारण भारतातील तरुणाईला अजिबात प्रेरक नाही. दूरगामी विचार करून सकारात्मक धोरणे बनवू शकत नाही, ही काँग्रेसची समस्या आहे. काँग्रेसच्या या विचारसरणीमुळे भारताची विद्युत यंत्रणा बदनाम झाली.विकसित भारत घडवण्यासाठी आम्ही देशातील तरुण, महिला, शेतकरी आणि गरीब या चार घटकांना मजबूत करण्यासाठी प्रयत्नरत आहोत. आमच्यासाठी याच चार सर्वात मोठ्या जाती आहेत. मला आनंद आहे की 'डबल इंजिन' सरकार या वर्गाच्या सक्षमीकरणासाठी 'मोदींची हमी' पूर्ण करत आहे. ते म्हणाले की, राजस्थानच्या भाजप सरकारने आपल्या पहिल्या अर्थसंकल्पात तरुणांसाठी ७० हजार रिक्त जागांवरील भरती जाहीर केली आहे. राजस्थान विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या पराभवाकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले, जेव्हा मोदी तुम्हाला दिलेल्या अशा हमींची पूर्तता करतात, तेव्हा काहींची झोप उडते. तुम्ही काँग्रेसची स्थिती पाहत आहात. नुकताच तुम्ही काँग्रेसला धडा शिकवला आहे. पण ते ते मान्य करत नाहीत. मोदींना जे सर्वाधिक शिव्या घालतात, त्यांना काँग्रेस जवळ घेते. मोदी ज्या विकसित भारतासाठी कार्यरत आहे, त्याचा उल्लेखही ते करत नाहीत असा आरोप मोदींनी केला.पंजाब-हरियाणाच्या शंभू सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन उग्र झाले असताना, शुक्रवारी हरियाणामधील रेवाडी येथील जाहीर कार्यक्रमात, 'केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी योजना राबवत आहे', असे सांगत आंदोलक शेतकऱ्यांना आश्वस्त करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसप्रणित 'यूपीए' सरकारवर शेतकऱ्यांची दिशाभूल केल्याचा आरोप मोदींनी केला. काँग्रेसने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफीचा योजना घोषित केली पण, त्याचा लाभ शेतकऱ्यांना घेता आला नाही. बँकेकडून कर्ज घेण्यासाठी काँग्रेसच्या सरकारने हमी दिली नाही. पण, केंद्रात आमचे सरकार आल्यावर शेतकऱ्यांना केवळ बँकेचे कर्ज मिळवून दिले नाही तर आम्ही हमीही दिली, असे मोदी म्हणाले.किमान आधारभूत किमतीसंदर्भात कायदा करण्याच्या प्रमुख मागणीसाठी पंजाब व हरियाणातील शेतकरी आंदोलन करत असून त्यासंदर्भात मोदींनी जाहीरपणे कोणतेही वक्तव्य केलेले नाही. मात्र, हरियाणातील कार्यक्रमाच्या निमित्ताने मोदींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांची अप्रत्यक्ष दखल घेतली. केंद्र सरकारने छोट्या शेतकऱ्यांना लाभ मिळवून देण्यासाठी किसान सन्मान निधीसारख्या योजना राबवल्याचे मोदींनी स्पष्ट केले. आंदोलक शेतकरी नेते व तीन केंद्रीय मंत्री यांच्यामध्ये गुरुवारी पाच तास झालेली चर्चाही निष्फळ ठरली. आत्तापर्यंत तोडगा काढण्यासाठी तीन बैठका झाल्या आहेत. शेतकरी नेत्यांनी अनेक सूचना केल्या असून चर्चा सकारात्मक झाली, असे केंद्रीय कृषिमंत्री अर्जुन मुंडा यांनी पत्रकारांना सांगितले. हमीभावाच्या मागणीवर तोडगा निघेपर्यंत आंदोलन चालू राहील, असे शेतकरी नेत्यांनी स्पष्ट केले.दरम्यान, शंभू सीमेवर शेतकऱ्यांचे आंदोलन सुरूच असून शुक्रवारीही आंदोलनांना रोखण्यासाठी पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर अश्रुधुरांचा मारा केला. तरीही पोलिसांच्या कारवाईला न जुमानता शेतकऱ्यांचा ठिय्या कायम आहे.

### सकारात्मक धोरणे बनवू

शेतकरी संघटनांनी शुक्रवारी 'भारत बंद'ची हाक दिली होती. त्यामुळे प्रामुख्याने पंजाबमध्ये काही ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाले. शंभू सीमा तसेच, हरियाणातील विविध ठिकाणी तसेच दिल्लीच्या वेशींवरही पोलीस व निमलष्करी दलांचा कडेकोट बंदोबस्त असून राजधानी परिक्षेत्रामध्ये जमावबंदी लागू करण्यात आली आहे.पराकोटीचा मोदीविरोध हेच काँग्रेसचे एकमेव धोरण आहे. मोदींच्या विरोध करताना समाजात फूट पडेल, अशा खोट्या गोष्टी ते पसरवतात. सध्या सर्व जण काँग्रेस सोडत आहेत. काँग्रेसचा कारभार एकाच कुटुंबाकडे एकवटलेला दिसत आहे. हे राजकारण भारतातील तरुणाईला अजिबात प्रेरक नाही. दूरगामी विचार करून सकारात्मक धोरणे बनवू शकत नाही, ही काँग्रेसची समस्या आहे. काँग्रेसच्या या विचारसरणीमुळे भारताची विद्युत यंत्रणा बदनाम झाली.विकसित भारत घडवण्यासाठी आम्ही देशातील तरुण, महिला, शेतकरी आणि गरीब या चार घटकांना मजबूत करण्यासाठी प्रयत्नरत आहोत. आमच्यासाठी याच चार सर्वात मोठ्या जाती आहेत. मला आनंद आहे की 'डबल इंजिन' सरकार या वर्गाच्या सक्षमीकरणासाठी 'मोदींची हमी' पूर्ण करत आहे.

# तर मी विधानसभा निवडणूक लढणार नाही : अजित पवार

## आम्ही ज्या उमेदवाराला उभा करू त्याला तुम्ही खासदार केलं पाहिजे

। बारामती ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

आगामी लोकसभा निवडणुकीत आम्ही ज्या उमेदवाराला उभा करू त्याला तुम्ही खासदार केलं पाहिजे, अशी माझी अपेक्षा आहे. तुम्ही लोकसभेला आमच्या उमेदवाराला निवडून दिलं तरच मी विधानसभा निवडणुकीला उभा राहीन, अन्यथा मी निवडणूक लढवणार नाही, असं वक्तव्य उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं आहे.



बारामती येथे आयोजित शेतकरी मेळाव्यात बोलताना अजित पवार यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांना आणि मतदारांना बारामती लोकसभा निवडणुकीत त्यांच्या गटातील उमेदवाराला जिंकवण्याचं आवाहन केलं. अजित पवार बारामतीकरांना म्हणाले, तुम्ही साथ देणार नसाल तर मला माझा प्रपंच पडला आहे. तुम्हाला काही लोक भावनिक करतील. परंतु, तुम्ही भावनिक होण्यापेक्षा विकासाला साथ द्यायला हवी. आता तुम्हाला विकास हवा आहे की भावनिक व्हायचं आहे ते तुम्हीच ठरवा. आगामी लोकसभा निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपली आहे. लोकसभेपाठोपाठ राज्यात विधानसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागतील. दरम्यान या निवडणुका लक्षात घेता महाराष्ट्रासह देशभरातील सर्वच पक्षांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने पुण्यासह महाराष्ट्रभर मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. अजित पवार आणि त्यांचे समर्थक आमदार जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत आहेत. महायुतीत लोकसभा निवडणुकीत बारामतीचा मतदारसंघ अजित पवार गटाकडे येण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अजित पवारांनी बारामतीत जोरदार प्रचार सुरू केला आहे. अजित पवारांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना या मतदारसंघातून उमेदवारी दिली जाऊ शकते.

### मी कशाला हे सगळं करू?

अजित पवार स्वतः सातत्याने बारामतीत फिरत आहेत. त्यांनी आज बारामतीत तीन मोठ्या कार्यक्रमांना हजेरी लावली. तसेच तिथे भाषणं केली. या भाषणांदरम्यान त्यांनी मतदारांना भावनिक आवाहन केलं.उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, "बारामतीत उद्या आम्ही ज्या उमेदवाराला उभा करू त्याला तुम्ही विजयी केलं पाहिजे. तरच मी पुढे विधानसभा निवडणुकीला उभा राहीन. मित्रांनो, मी तुम्हाला खरं सांगतोय. नाहीतर खुशाल मी माझा प्रपंच बघेन. तुम्ही मला साथच देणार नसाल तर मला माझा प्रपंच पडलाय. मला माझे धंदे पडलेत. मी कशाला हे सगळं करू?" यावेळी अजित पवार समर्थकांनी त्यांच्या नावाने घोषणा दिल्या. त्यावर अजित पवार म्हणाले.

# ज्युनियर एनटीआरच्या 'देवरा'ची रिलीज डेट ढकलली पुढे

टॉलिवूड सुपरस्टार ज्युनियर एनटीआर आणि जान्हवी कपूर अभिनीत 'देवरा' या सिनेमाची सध्या चांगलीच चर्चा आहे. कोरताला शिवाने या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. घोषणा झाल्यापासून सिनेप्रेमी या सिनेमाची प्रतीक्षा करत होते. अशातच आता या सिनेमाची रिलीज डेट पुढे ढकलण्यात आल्याचं समोर आलं आहे.'आरआरआर' सुपरहिट झाल्यानंतर ज्युनियर एनटीआर त्याच्या आगामी 'देवरा' या सिनेमामुळे चर्चेत आहे. अभिनेत्याच्या या आगामी सिनेमात प्रेक्षकांना ॲक्शन ड्रामा पाहायला मिळणार आहे. 'देवरा' हा पॅन इंडिया सिनेमा आहे. 'देवरा' हा सिनेमा आधी 5 एप्रिल 2024 रोजी प्रदर्शित होणार होता. अशातच आता निर्मात्यांनी या सिनेमाच्या रिलीज डेटमध्ये बदल केला आहे. निर्मात्यांनी सोशल मीडियावर खास पोस्ट शेअर करत या सिनेमाची रिलीज डेट बददली असल्याची घोषणा केली आहे. 'देवरा' हा सिनेमा आता 10 एप्रिल 2024 रोजी रिलीज होणार आहे.कोरताला शिवा दिग्दर्शित देवरा या सिनेमाची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. 300 कोटींच्या बजेटमध्ये या सिनेमाची निर्मिती करण्यात आल्याचं म्हटलं जात आहे. दोन भागांमध्ये



हा सिनेमा रिलीज होणार आहे. पहिला भाग 10 एप्रिल 2024 रोजी प्रदर्शित होईल. तेलुगू, तामिळ, हिंदी, कन्नड आणि मल्याळम या भाषांमध्ये हा सिनेमा रिलीज होणार आहे. युवासुधा आर्ट्स आणि एनटीआर आर्ट्सच्या बॅनरअंतर्गत 'देवरा' या सिनेमाची निर्मिती होत आहे. अनिरुद्ध रविचंदरने या सिनेमाला संगीत दिलं आहे. देवरा हा बिग बजेट सिनेमा आहे. या सिनेमाच्या वीएफएक्सवर 140 कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. ज्युनियर एनटीआरच्या या बहुचर्चित सिनेमाची प्रेक्षकांना उत्सुकता आहे. टॉलिवूड सुपरस्टार ज्युनियर एनटीआरच्या आगामी पॅन इंडिया 'देवरा' या सिनेमाची रिलीज डेट आता पुढे ढकलण्यात आली असल्याने चाहते मात्र नाराज झाले आहेत. ज्युनिअर एनटीआरने 'वॉर 2' या सिनेमाच्या माध्यमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं.

## सावली बदलणार भविष्याची दिशा

'प्रतिसोध - झुंज अस्तित्वाची' ही छोट्या पडद्यावरील लोकप्रिय मालिका आहे. गेल्या काही दिवसांपासून ही मालिका प्रेक्षकांचं चांगलच मनोरंजन करत आहे. आता ही मालिका रंजक वळणावर आली आहे. या मालिकेत आता एका नव्या पात्राची एन्ट्री होणार आहे.'प्रतिशोध' झुंज अस्तित्वाची' ही मालिका सध्या रंजक वळणावर येऊन ठेपली आहे. मालिका प्रेक्षकांच्या पसंतीस उतरते आहे. 'प्रतिशोध' ही मालिका आई आणि मुलगी यांच्या विशिष्ट नात्यावर भाष्य करणारी थरारक मालिका आहे. तृतीयपंथी आई आणि दिशा नावाची मुलगी यांचं नातं आणि त्यांचा संघर्ष यांची कहाणी या मालिकेतून दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. ममता एम.डी. झालेली आहे आणि दिशा तिची मुलगी आहे हे सिद्ध करण्यासाठी तिला झटावे लागते आहे. सत्यजित राहण्यासाठी तिला हे साध्य करणे फार महत्त्वाचे आहे.

## अनुष्काच्या बाळाचा जन्म?

बॉलीवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा व भारतीय फलंदाज विराट कोहली लोकप्रिय कपल आहे. सोशल मीडियावर दोघे मोठ्या प्रमाणावर सक्रिय असतात. निरनिराळे फोटो व व्हिडीओ शेअर करत ते चाहत्यांना अपडेट देत असतात. गेल्या काही दिवसांपासून अनुष्का दुसऱ्यांदा गरोदर असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. लवकरच अनुष्का दुसऱ्यांदा आई होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. आता अनुष्काच्या दुसऱ्या गरोदरपणाबाबत उद्योगपती हर्ष गोयंका यांनी एक क्रिप्टिक ट्विट केले.भारताचे प्रसिद्ध उद्योगपती हर्ष गोयंका यांनी आपल्या ट्वीटमध्ये (एक्स) एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी अनुष्का व विराटच्या दुसऱ्या बाळाबाबत भाष्य केले आहे. गोयंका यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे. एक नवीन बाळ काही दिवसांत जन्माला येणार आहे. आशा आहे की हे बाळ त्याच्या वडिलांसारखं क्रिकेटचं मैदान गाजवेल किंवा आईसारखं फिल्मस्टार होईल? या पोस्टबरोबर त्यांनी काही हॅशटॅगही वापरले आहेत. त्यांनी मेड इन इंडिया, टू बी बॉर्न इन लंडन हॅशटॅग वापरले आहेत.गोयंका यांची पोस्ट सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाली आहे. या पोस्टवरून विराट व अनुष्काचे दुसरे मूल भारतात नाही तर लंडनमध्ये जन्माला येणार असल्याची चर्चा सुरू आहे.



## सुपरहिट शो 'शक्तिमान' का बंद करावा लागला?

90 च्या दशकात दूरदर्शनसह मोजक्याच खासगी टीव्ही चॅनेल होते. या काळात काही टीव्ही मालिकांनी प्रचंड लोकप्रियता मिळाली. काही मालिका आजही प्रेक्षकांच्या मनात घर करून आहेत. पहिला भारतीय सुपरहिरो मुकेश खन्ना यांनी 'शक्तिमान'च्या रुपाने टीव्हीवर आणला. 1997 साली सुरू झालेल्या मालिकेने टीव्हीवर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला. सुरुवातीला शनिवारी आणि त्यानंतर रविवारी ही मालिका प्रसारीत होत असे. शक्तिमान हे नाव या काळातील बच्चे कंपनीसाठीचे भावनिक नाते आहे. त्यामुळेच ही मालिका बंद झाली तेव्हा अनेकांना धक्का बसला. 90 च्या दशकात सुपरहिट असणारा शक्तिमान हा शो लोकप्रिय होता. त्यानंतर अचानकपणे हा शो बंद झाल्यानंतर लोकांना धक्का बसला. शो सुपरहिट होता, टीआरपी देखील होता. तरीदेखील निर्मात्यांनी शो का बंद केला असा प्रश्न अनेकांना पडला. अनेक वर्षांनंतर मुकेश खन्ना यांनी शो का बंद करावा लागला, याचे कारण सांगितले. मुकेश खन्ना यांनी कोरोनादरम्यान त्यांच्या यूट्यूब चॅनेलवर याचे कारणच सांगितले. त्यांनी सांगितले की,'शक्तिमान सुरू झाले तेव्हा ते दूरदर्शनवर टेलिकास्ट करण्यासाठी 3 लाख रुपये दूरदर्शनच्या मालकाला देत होते. त्याला प्राइम टाइम मिळत नव्हता, त्याला मंगळवार रात्रीचा आणि शनिवारचा दिवसाचा स्लॉट मिळाला मुकेश खन्ना पुढे म्हणाले, 'मी हा शो मुलांसाठी बनवला होता आणि त्यांनी तो पाहिला नाही तर काही अर्थ नव्हता.

## अनंत-राधिकाच्या प्री-वेडिंग फंक्शनला सुरुवात

मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांच्या घरी लगीनघाईला सुरुवात झाली आहे. देशातील सर्वात श्रीमंत उद्योगी मुकेश अंबानी यांचा धाकटा मुलगा अनंत अंबानी लवकरच राधिका मर्चेंटसोबत लग्नबंधनात अडकणार आहे. अनंत-राधिका यांच्या प्री-वेडिंग कार्यक्रमांना आता सुरुवात झाली आहे. अनंत आणि राधिका यांच्या लग्नाच्या चर्चा सध्या जोरदार सुरू आहेत. लगन लखवानु या कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांच्या प्री-वेडिंग फंक्शला सुरुवात झाली आहे. नुकतचं गुजरात येथील जामनगरमध्ये अनंत आणि राधिका यांचा लगन लखवानु हा कार्यक्रम पार पडला आहे. या कार्यक्रमादरम्यान राधिका खूपच सुंदर दिसत होती. तिचे लक्षवेधी फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. लगन लखवानु या कार्यक्रमादरम्यान राधिका मर्चेंटने डिझायनर अनामिका खन्नाने डिझाईन केलेला लेहेंगा परिधान केला होता. या लेहेंग्यावरील फ्लोरल वर्क चाहत्यांच्या पसंतीस उतरलं आहे. या लूकमध्ये राधिका खूपच एलीगेंट दिसत होती. लेहेंग्यावर तिने हिऱ्याचा हार घातला होता. तिची लाल रंगाची टिकलीदेखील खूपच लक्षवेधी होती. कोणतीही भारी हेअरस्टाईल करण्यापेक्षा राधिकाने मोकळे केस ठेवायला पसंती दर्शवली. तसेच सटल मेकअपमध्ये राधिका खूपच सुंदर दिसत होती. अनंत अंबानी आणि राधिका मर्चेंट यांचं प्री वेडिंग कार्ड काही दिवसांपूर्वी व्हायरल झालं आहे. वेडिंग कार्डनुसार, 1 ते 3 मार्चदरम्यान अनंत आणि राधिका यांचा लग्नसोहळा चालणार आहे. या लग्नसोहळ्याला बॉलिवूडचे अनेक सेलिब्रिटी हजेरी लावणार आहेत. गुजरात येथील जामनगरमध्ये जुलैमध्ये ते लग्नबंधनात अडकणार असल्याचंही म्हटलं जात आहे.



# अश्विन सामन्यातून तडकाफडकी बाहेर

## अश्विन कौटुंबिक अडचणीमुळे अचानक सामन्यातून बाहेर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड यांच्यात राजकोटमध्ये पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यातील दुसऱ्या दिवशी (१६ फेब्रुवारी) इंग्लंडच्या पहिल्या डावात रविचंद्रन अश्विनने जॅक क्रॉलीला बाद करत मोठा पराक्रम केला. आज कसोटीच्या दुसऱ्या दिवशी त्याने आपल्या कारकिर्दीतील ५०० वी विकेट घेतली. हा पल्ला गाठणारा तो जगातील नववा आणि दुसरा भारतीय गोलंदाज ठरला. मात्र रविचंद्रन अश्विनला तिसऱ्या कसोटीतून अचानक माघार घ्यावी लागली आहे. अश्विनच्या बाहेर जाण्यामुळे भारतला एक मोठा झटका बसला आहे.**



तिसऱ्या कसोटीत भारताने पहिल्यांदा फलंदाजी करत असताना सर्वबाद ४४५ धावा केल्या. त्यात अश्विनने ३७ धावांचे महत्त्वाचे योगदान दिले. त्यानंतर गोलंदाजीला सुरुवात झाल्यानंतर त्यानेच भारताला जॅक क्रॉलीच्या रुपात पहिले यश मिळवून दिले होते. मात्र रविचंद्रन अश्विनच्या कुटुंबात अचानक अडचण निर्माण झाल्यामुळे त्याला सामन्यात मधूनच बाहेर पडावे लागत आहे. बीसीसीआयने आपल्या एक्स अकाऊंटवरून याबद्दल माहिती दिली.बीसीसीआयने आपल्या एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, या कठीण परिस्थितीमध्ये भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्ड आणि संघातील सर्व खेळाडू, सहकारी कर्मचारी रविचंद्रन अश्विनच्या पाठिशी आहेत. खेळाडूंच्या कुटुंबियांना आम्ही पाठिंबा देतो आणि त्यांचे आरोग्य आणि खुशाली आमच्यासाठी सर्वाधिक महत्त्वाची आहे. या आव्हानात्मक परिस्थितीतून अश्विन आणि कुटुंबिय बाहेर पडतील, अशी आशा करुयात, अशी प्रतिक्रिया बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी बीसीसीआयच्या संकेतस्थळावर दिली आहे. आज रविचंद्रन अश्विन कसोटीत ५०० विकेट्स घेणारा नववा गोलंदाज ठरला. कसोटी फॉरमॅटमध्ये सर्वाधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत श्रीलंकेचा मुथय्या मुरलीधरन पहिल्या क्रमांकावर आहे. मुथय्या मुरलीधरनच्या नावावर ८०० कसोटी विकेट्स आहेत. यानंतर ऑस्ट्रेलियाचा माजी दिग्गज शेन वॉर्न दुसऱ्या स्थानावर आहे. शेन वॉर्नच्या नावावर १४५ कसोटी सामन्यांमध्ये ७०८ विकेट्स आहेत. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर जिमी अँडरसन तर चौथ्या क्रमांकावर भारतीय दिग्गज अनिल कुंबळे आहे. जिमी अँडरसन आणि अनिल कुंबळे यांच्या नावे अनुक्रमे ६९५ आणि ६१९ विकेट्स आहेत.इंग्लंडविरुद्ध खेळल्या जात असलेल्या तिसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी शेवटच्या सत्रात रविचंद्रने अश्विनने इंग्लंडचा सलामीवीर झॅक क्रॉउलीला बाद करत कसोटी क्रिकेटमधील ५०० विकेट्स पूर्ण केल्या. हा टप्पा गाठणारा अश्विन हा भारताचा दुसरा आणि जगातील नववा गोलंदाज ठरला. सामन्यानंतर रविचंद्रन अश्विनने आपल्या या पराक्रमाबद्दल प्रतिक्रिया दिली. त्याने आपली ५००वी विकेट वडिलांना समर्पित केली आहे. रविचंद्रन अश्विनने १३ वर्षांच्या दीर्घ प्रवासानंतर कसोटी क्रिकेटमध्ये ५०० बळी पूर्ण केले. सामन्यानंतर अश्विन म्हणाला, "हा खूप लांबचा प्रवास राहिला आहे. माझी ५००वी विकेट वडिलांना समर्पित करायची आहे. आयुष्यात कोणतीही परिस्थिती आली तरी माझे वडील नेहमी माझ्या पाठीशी उभे राहिले. माझ्या वडिलांमुळेच मी आयुष्यात सर्व काही मिळवू शकलो. माझ्या वडिलांची प्रकृतीही खराब असून तरीही ते मला गोलंदाजी करताना नक्कीच पाहतात. त्यांनी मला नेहमीच पाठिंबा दिला आहे."इंग्लंडच्या डावाबद्दल बोलताना अश्विन म्हणाला, "५०० विकेट पूर्ण झाल्या आहेत. इंग्लंड ज्या प्रकारे खेळत आहे, तुम्हाला जास्त षटके टाकण्याची गरज नाही. इंग्लंड आक्रमक क्रिकेट खेळत आहे. आम्हाला विचार करण्याची संधी मिळत नाही. पण पुढे या खेळपट्टीवर फलंदाजी करणे कठीण जाईल, असे मला वाटते. पाचव्या दिवशी तर खूपच अवघड होणार आहे. खेळात समतोल असून सामना कोणत्याही बाजूला झुकू शकतो. आम्ही सकाळी पुनरागमन करण्याचा प्रयत्न करू. तसेच आम्हाला दबावातून बाहेर पडण्याची गरज आहे.

### क्रॉलीला बाद करत पराक्रम

भारत आणि इंग्लंड यांच्यातील तिसऱ्या कसोटी सामन्याचा दुसरा दिवस संपला आहे. इंग्लंडने पहिल्या डावात बेन डकेटच्या नाबाद शतकी खेळीच्या जोरावर ३४ षटकानंतर २ बाद २०७ धावा केल्या आहेत. भारतीय संघ अजून २३८ धावांनी पुढे आहे. सध्या इंग्लंडकडून बेन डकेट १३३ धावांवर नाबाद तर जो रूट नऊ धावांवर खेळत आहे. या सामन्याच्या पहिल्या डावात भारताने ४४५ धावा केल्या. राजकोटमध्ये पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यातील दुसऱ्या दिवशी इंग्लंडच्या पहिल्या डावात रविचंद्रन अश्विनने जॅक क्रॉलीला बाद करत मोठा पराक्रम केला.

# डकेटच्या शतकाच्या जोरावर इंग्लंडचा पलटवार

## इंग्लडच्या विकेट घेताना भारतीय गोलंदाजांना फुटला घाम

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारत आणि इंग्लंड यांच्यात राजकोटमध्ये पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने पहिल्या डावात ४४५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडने बेन डकेटच्या शतकाच्या जोरावर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३५ षटकानंतर २ बाद २०७ धावा केल्या आहेत. तसेच इंग्लंड भारताच्या तुलनेत २३८ धावांनी पिछाडीवर आहे.**

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडकडून सलामीवीर बेन डकेट आणि जो रूट नाबाद परतले. बॅन डकेट १३३ धावा करून खेळत आहे. तर जो रूट ९ धावा करून क्रीजवर आहे. भारताकडून रवी अश्विन आणि मोहम्मद सिराज यांना प्रत्येकी एक विकेट मिळाले. रवी अश्विनने सलामीवीर जॅक क्रॉलीला बाद केले. यासह रवी अश्विनने कसोटीत ५०० बळींचा आकडा गाठला. जॅक क्रॉलीने १५ धावा केल्या. ओली पोप ३९ धावा करून मोहम्मद सिराजचा बळी ठरला.बेन डकेटने इंग्लंड्या बॅझबॉल रणनीतीचे पूर्णपणे पालन केले आणि केवळ ८७ चेंडूत शतक झळकावले. हे त्याचे भारतातील पहिले शतक असून त्यात त्याने विक्रम केला आहे. ८८ चेंडूत शतक हे भारतातील कसोटीत इंग्लिश फलंदाजाचे




सर्वात जलद शतक आहे. त्याचबरोबर परदेशी फलंदाजाचे हे तिसरे जलद शतक आहे. ॲडम गिलख्रिस्टने २००१ मध्ये भारतात ८४ चेंडूत शतक झळकावले होते. वेस्ट इंडिजच्या क्लाइव्ह लॉईडने १९७४ मध्ये ८५ चेंडूत शतक झळकावले होते. डकेटने १२ वर्षांपूर्वी बेंगळुरूमध्ये रॉस टेलरने झळकावलेल्या ९९ चेंडूंच्या शतकाला मागे टाकले आणि तिसऱ्या क्रमांकावर पोहोचला.

### बेन डकेट आणि जो रूट नाबाद

ध्रुव जुरेल १०४ चेंडूत ४६ धावा करून रेहान अहमदच्या गोलंदाजीवर बाद झाला. रवी अश्विन ३७ धावा करून रेहान अहमदचा बळी ठरला. जसप्रीत बुमराहने २६ धावांचे उपयुक्त योगदान दिले. भारत आणि इंग्लंड यांच्यात राजकोटमध्ये पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील तिसरा सामना खेळला जात आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना भारताने पहिल्या डावात ४४५ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात इंग्लंडने बेन डकेटच्या शतकाच्या जोरावर दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ३५ षटकानंतर २ बाद २०७ धावा केल्या आहेत. तसेच इंग्लंड भारताच्या तुलनेत २३८ धावांनी पिछाडीवर आहे. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत इंग्लंडकडून सलामीवीर बेन डकेट आणि जो रूट नाबाद परतले.

दुसऱ्या दिवशी भारतीय संघाला ३३१ धावांवर सहावा धक्का बसला. कुलदीप यादव ४ धावा करून जिमी अँडरसनचा बळी ठरला. यानंतर रवींद्र जडेजाला जो रूटने बाद केले. जडेजाने २२५ चेंडूत ११२ धावांची खेळी खेळली. यानंतर ध्रुव जुरेल आणि रवी अश्विन यांच्यात चांगली भागीदारी झाली.